RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर होणारा परिणाम

**डॉ.शंकर धनवडे**
*सहाय्यक प्राध्यापक*
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर पिन 416 003

माहिती तंत्रज्ञानाचा संगणक हा एक अविभाज्य भाग आहे. शैक्षणिक क्षेत्रात विशेषत: अध्यापनाच्या क्षेत्रात या संगणकावरील पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा वापर आता हळुहळू वाढत चालला आहे. केवळ शिक्षणक्षेत्रातच नव्हे तर जिथे आपल्या मुद्दांचे सादरीकरण करायचे असते तिथे - उदा. कार्पोरेट क्षेत्र, अभियांत्रिकी, वैद्यकिय, इ.- या पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा वापर होत असतो. शिक्षणक्षेत्रात अध्यापनासाठी पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचे विशेष महत्व आहे. अध्यापनाचे एक विशेष तंत्र म्हणून आता पॉवरपॉईट प्रेझेंटेशन च्या तंत्रज्ञानाकडे पाहिले जात आहे. या पॉवरपॉईट प्रेझेंटेशनच्या तंत्राला अनुदेशनात्मक उपयोजनमूल्य प्राप्त होत आहे.

पॉवरपॉईट हे माहितीच्या सादरीकरणासाठी एक उपयुक्त असे संगणकाधारित साधन आहे. त्याचा उपयोग हा आपले सादरीकरण जास्त अचूक, आकर्षक, मनोरंजक पद्धतीने करण्यासाठी होतो. यात स्थिर मजकूर, रंगसंगती, ॲनिमेशन, आवाज, संगीत, चल्‌चित्रांचा वापर हा ज्याच्या त्याच्या कल्पकतेप्रमाणे होत असतो. अध्यापनाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी या पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा असते. या उद्दिष्ट साध्यतेसाठीच पॉवरपॉईट प्रेझेंटेशन हे एक साधन आहे. काही शिक्षक आपल्या दैनंदिन अध्यापनासाठी नियमित रूपाने पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा उपयोग करीत असतात तर काहीजण याचा वापर क्वचित करताना दिसतात. पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी किती व कसा उपयोग होतो हे विविध संदर्भात अभ्यासणे गरजेचे आहे. पॉवरपॉईटमध्ये आपल्या आशयाच्या सादरीकरणासाठी अनेक पर्याय म्हणजे ऑप्शन्स असतात. मात्र ही सर्वच ऑप्शन्स वापरकर्त्याला ज्ञात नसली तरीही थोडया व नित्य गरजेच्या ऑप्शन्सच्या सहाय्याने पॉवरपॉईट प्रझेंटेशनचा वापर वर्गाध्यापनात करता येतो. पॉवरपॉईटमधील ॲनिमेशन हे एक आशय आकर्षकप्रकारे सादर करण्यासाठी वापरले जाणारे महत्वाचे ऑप्शन आहे.

## ॲनिमेशन म्हणजे काय?

एम्.एस्. पॉवरपॉईट या ड्रॉईंग टुलमधील 'ॲनिमेशन' ही एक आपल्या मजकुराच्या म्हणजे आशयाच्या सादरीकरणासाठी असलेली विशेष सुविधा आहे. हे ॲनिमेशन आपणास कोणत्याही स्लाईडस्‌ला प्रामुख्याने पुढील चार कारणांसाठी वापरता येते -

1. स्लाईडवरील आपल्या मजकुराच्या प्रवेशासाठी (Entrance)
2. विशिष्ट मजकुरावर भर देण्यासाठी (Emphasis)

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

3. स्लाईडवरून मजकुर घालविण्यासाठी (Exit)
4. स्लाईडवरील मजकुरास विशिष्ट दिशेत गती देण्यासाठी (Motion path)

वरीलपैकी एक किंवा एकापेक्षा अधिक किंवा सर्वांचाच स्लाईडवरील मजकुरासाठी वापर केला असेल तर त्यास 'ॲनिमेटेड स्लाईड' असे संबोधतात ; आणि जर यापैकी एकाचाही स्लाईडसाठी वापर केला गेला नसेल तर ती 'नॉन-ॲनिमेटेड स्लाईड ' होय.

पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमध्ये वापरल्या जाणा-या या ॲनिमेशन प्रकाराचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर किती परिणाम होतो हे अभ्यासण्याच्या हेतूने पुढील विषय निवडला आहे -

**संशोधन समस्या :** पॉवरपॉईट प्रेझेंटेशनचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर होणा-या परिणामाचा अभ्यास.

या अभ्यासात पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमधील पुढील बाबींचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला - 1. नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस् व 2. ॲनिमेटेड स्लाईडस्

**शून्य परिकल्पना:** पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमधील नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस व ॲनिमेटेड स्लाईडस वापरून केलेल्या अध्यापनानंतरच्या विद्यार्थ्यांच्या संपादणुकीमध्ये फरक नाही.

**प्रस्तुत संशोधनाची कार्यपद्धती**

हे संशोधन प्रायोगिक पद्धतीचे असून त्यासाठी एकल गट पूर्व उत्तर चाचणी अभिकल्पाचा वापर केला आहे व नमूना म्हणून 70 विद्यार्थ्यांची निवड सहेतूक पद्धतीने केली आहे. या प्रयोगासाठी विद्यार्थ्यांची संपादणुक हे आश्रयी चल तर पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमधील स्लाईडस्द्वारे केलेले अध्यापन हे स्वाश्रयी चल होते. तथापि, विद्यार्थ्यांची अभिवृत्ती, मानसिक स्थिती, इ. बाहय चलांच्या मर्यादा संशोधनास होत्या.

विद्यार्थ्यांना एका विशिष्ट पाठयांशाचे नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस्चा वापर करून अध्यापन करण्यात आले व त्यानंतर 20 गुणांची चाचणी घेण्यात आली. त्याच विद्यार्थ्यांना समान काठिण्य पातळी असलेल्या अन्य पाठयांशाचे ॲनिमेटेड स्लाईडस्चा वापर करून अध्यापन करण्यात आले व त्यानंतर 20 गुणांची चाचणी घेण्यात आली. या नॉन-ॲनिमेटेड व ॲनिमेटेड स्लाईडस्च्या वापरानंतर घेण्यात आलेल्या चाचणीतील गुणांच्या सरासरीवरून त्यांच्यातील संपादणुकीची तुलना करण्यात आली.

या संशोधनात पुढील बाबी आढळल्या -

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341




वरील आलेखावरून असे लक्षात येते की नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस् वापरून केलेल्या अध्यापनानंतर विद्यार्थ्यांच्या संपादणुकीतील गुणांची सरासरी 14.14 इतकी आहे तर ॲनिमेटेड स्लाईडस् वापरून केलेल्या अध्यापनानंतरची विद्यार्थ्यांच्या गुणांची सरासरी ही 16.9 इतकी आहे. म्हणजेच ॲनिमेटेड स्लाईडस् अध्यापनात वापरल्यानंतर घेतलेल्या चाचणीत गुणांची सरासरी ही 2.76 ने वाढली आहे. या संकलित माहितीचे अधिक सांख्यिकीय विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे –

सारणी क्र.1

| पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनचा वापर | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | क्रांतिक अंकाचे मूल्य | सारणी `टी' मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| नॉन-ॲनिमेटेड स्लाईड | 14.14 | 1.23 | 69 | 13.14 | 1.99 |
| ॲनिमेटेड स्लाईड | 16.90 | 1.28 | | | |

वरील सारणीतील सांख्यिकीय विश्लेषणावरून हे लक्षात येते की मिळालेले क्रांतिक अंकाचे मूल्य 13.14 इतके आहे. सारणीतील 'टी' मूल्यापेक्षा ते जास्त असल्याने 0.05 स्तरावर सार्थक आहे. यावरून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. म्हणूनच पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनमधील नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस व ॲनिमेटेड स्लाईडस वापरून केलेल्या अध्यापनानंतरच्या विद्यार्थ्यांच्या संपादणुकीमध्ये लक्षणीय फरक आढळतो.

## निष्कर्ष

1. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनमधील नॉन-ॲनिमेटेड स्लाईडस वापरून केलेल्या अध्यापनापेक्षा ॲनिमेटेड स्लाईडस वापरून केलेले अध्यापन जास्त परिणामकारक आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

2. पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमधील नॉन-ॲनिमेटेड स्लाईडसपेक्षा शिक्षकांनी ॲनिमेटेड स्लाईडस वापरून केलेल्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीमध्ये वाढ होते.
3. केवळ शाब्दीक रित्या अध्यापन केले तर विद्यार्थ्यांच्या दृक प्रतिमा लवकर तयार होत नाहीत. त्यासाठी शाब्दीक अध्यापनाला दृक माध्यमाची जोड द्यावी लागते. मात्र हे दृक माध्यम स्थिर म्हणजे नॉन-ॲनिमेटेड स्वरूपाचे असण्यापेक्षा ते चल् म्हणजे ॲनिमेटेड स्वरूपाचे असल्यास अधिक परिणामकारक ठरते. स्लाईडस्चे ॲनिमेटेड स्वरूप हे विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला अनुकूल असते.

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षावरून हे लक्षात येते की शिक्षकांनी आपल्या दैनंदिन अध्यापनात पॉवरपॉईट प्रेझेंटेशनमधील ॲनिमेटेड स्लाईडस्चा अधिकाधिक वापर करावा जेणेकरून विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक सुलभ होईल. पॉवरपॉईट प्रेझेंटेशन नियमित वापरणा-या शिक्षकांनी आपल्या स्लाईडसमधील ॲनिमेशनमध्ये वैविध्य व अर्थ पूर्णता आणावी. कारण अशा ॲनिमेशनमुळेच विद्यार्थ्यांचे अवधानकेंद्रीकरण होते. शिवाय वर्गनियंत्रणाचे प्रश्नही कमी होण्यास मदत होते.

* * *